# नवजात वासरांची काळजी

१. नवीन जन्मलेल्या वासरांच्या अंगाला चिकट पदार्थ चिटकलेला असतो, तो पदार्थ विलेली म्हैस / गाय आपल्या जिभेने स्वछ करते, जर असे झाले नाही तर वासराला कोरड्या कपड्याने साफ करावे.



२. सर्वप्रथम वासराच्या नाकातोंडातील चिकट पदार्थ स्वच्छ करावा जेणेकरून श्वासोच्छवासाला त्रास होणार नाही, अन्यता श्वासोच्छवासाला त्रास होत असेल तर कृत्रिम श्वास देण्यासाठी आपल्या दोन्ही हाताने वासराच्या छातीवर हलका दाब देण्याची गरज असते.

३. वासराची नाळ नव्या ब्लेडने किंवा निर्जतुक केलेल्या चाकूने बेंबिपासुन दोन ते तीन इंच अंतरावर कापावी व त्याला आयोडीन लावावे . असे केल्यास वासरांना होणारा बेंबीचा हर्निया , बेंबिजवळ पू भरणे अशा समस्या होत नाहीत.



४. जास्त करून वासरे एका तासाभरात आपल्या पायावर उभी राहून मातेचे दूध पितात, जर विलंब होत असेल तर वासरांना उभे करून दूध पिण्यास मदत करावे.

५. विल्यानंतर लगेचच मातेचे कास व सडे स्वच्छ कोमट पाण्याने धुवून पुसून घ्यावीत त्यानंतरच वासरांना दूध पाजवावे .



६. वासरू जन्मल्यानंतर दोन तासाच्या आत त्याला मातेचे पहिले दूध ( चिक / डिक ) पाजवावे . साधारणपणे दिवसभरात वासराच्या वजनाच्या १/१० चिक त्याला द्यावे. चीकामुळे नवजात वासरांत रोगप्रतिकारक शक्ति निर्माण होते, पोट साफ होण्यास मदत होते व वासरे लहान वयातील बऱ्याच आजारापासून वाचू शकतात.

७. वासरू जन्मल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत इलेक्ट्रिकल डीहार्नरच्या सहयाने शिंगाच्या कळ्या जाळून घेतल्या पाहिजेत.

८. वयाच्या तिसऱ्या दिवशी प्रथम जंतनाशक औषध (फेनबेंडयाझोल, अलबेंडयाझोल इ. ) पाजवावे, त्यानंतर महिन्याला एकदा याप्रमाणे ६ महिन्यापर्यन्त वासराला जंतनाशक औषध पाजवावे.



प्रकाशक : **डॉ. एकनाथ भा. चाकूरकर,** निर्देशक, भाकृअनुप.-केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र
संपादक : **श्री एच. आर. सी. प्रभू,** कार्यक्रम समन्वयक
लेखन : **डॉ. संजयकुमार वि. उद्धरवार,** विषय तज्ञ (पशु विज्ञान), **डॉ. एकनाथ भा. चाकूरकर,** मुख्य शास्त्रज्ञ (पशु विज्ञान)
तकनीकी सह्यायक : **श्री. विश्वजीत प्रजापती,** कार्यक्रम सह्यायक (कॅम्पूटर)

**कृषि विज्ञान केंद्र**

भाकृअनुप-केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

जुने गोवें, गोवा-403402 फोन : 0832-2285475, ई-मेल : pckvknorthgoa@gmail.com वैबसाइट : www.kvkicarrcgoa.in